| Published Date: | Thursday 11th February, 2021 | Publication: | Vrutta Manas (Marathi) [Mumbai] |
|---|---|---|---|
| Journalist: | Bureau | Page No: | 8 |
| MAV/CCM: | 21,489/32 | Circulation: | 75,000 |

# अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल)तर्फे एनएपीएस (नॅशनल अप्रेन्टिस प्रमोशन स्किम) अंतर्गत युनिक अप्रेन्टिसशीप प्रोग्राम सादर

■ मुंबई

प्रशिक्षण ऊर्जा उद्योगक्षेत्र व कुशल मनुष्यबळामधील पोकळी भरून काढेल या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अभ्यासक्रमामध्ये शिकलेल्या गोष्टी आणि ऊर्जा उद्योगक्षेत्रासाठी खऱ्या कुशल मनुष्यबळाच्या गरजेमधील पोकळी भरून निघेल मुंबई, फेब्रुवारी १०, २०२१: अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने (एईएमएल) त्यांच्या वर्सोवा टेक्निकल ट्रेनिंग सेंटरमधील (व्हीटीटीसी) डिप्लोमाधारकांसाठी १२ महिन्यांच्या कालावधीकरिता नॅशनल अप्रेन्टिस प्रमोशन स्किम (एनएपी) अंतर्गत अद्वितीय युनिक अंप्रेन्टिसशीप ट्रेनिंग प्रोग्राम सादर केला आहे. हा प्रशिक्षण उपक्रम सहभागींना ऊर्जा विभागामध्ये आत्मविश्वासाने व कार्यक्षमपणे काम करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान व कौशल्य संपादित करण्यामध्ये सक्षम करेल.

एईएमएलने पॉवर सेक्टर स्किल कौन्सिलसोबत (पीएसएससी) सहयोगाने भारतातील एनएपीएस स्किम (नॅशनल अप्रेन्टिसशीप प्रमोशन स्किम) अंतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रम सादर केला आहे. हा उपक्रम ट्रिपल सर्टिफिकेशन म्हणजेच ज्युनिअर इंजीनिअर ऊर्जा वितरण, प्रशिक्षणाच्या पर्यायी व्यापाऱ्या मधील पीएसएससीद्वारे सर्टिफिकेशन देतो, तसेच यामध्ये अधिकृत व्यक्ती म्हणून विद्युत यंत्रणेवर काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग पर्यवेक्षक परवाना मिळवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रमुख विद्युत निरीक्षकाने सूचित केलेल्या ''सर्टिफिकेशन कोर्स ऑन इलेक्ट्रिकल सेफ्टी अॅण्ड डिझाइन अस्पेक्ट्स ऑफ इलेक्ट्रिकल इन्सूटॉलेशन''वर १२ आठवड्यांच्या कोर्सचा अभ्यासक्रम देखील आहे. एम/एस अदाणी इलेक्ट्रिसिटी सहभागींना प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण पूर्तता प्रमाणपत्र देखील देईल. व्हर्च्युअल व्यासपीठावर रवी पी. सिंग (पीएसएससीचे मुख्य कार्यकारी अधिकारी) यांच्या हस्ते प्रशिक्षण उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्हीटीटीसी येथील कार्यक्रमाप्रसंगी सन्माननीय अतिथी म्हणून अशोक कानसे (विद्युत निरीक्षक, महाराष्ट्र शासन) उपस्थित होते. तसेच वितरणाचे (एईएमएल) मुख्य कार्यकारी अधिकारी कपिल शर्मा, एचआर प्रमुख (एईएमएल) मनोज शर्मा व एईएमएलमधील इतर मान्यवर आणि माजी प्रशिक्षण सल्लागार सी. एन. नागाकुमार हे देखील उपस्थित होते.